
# ईशान्य ओहायो मराठी मंडळ

# ज्योती २०२०

वार्षिक अंक । नोव्हेंबर २०२० । भारतीय सौर कार्तिक शके १९४२

# अध्यक्षीय



नमस्कार ईशान्य ओहायो मराठी मंडळ परिवार !!!

सर्वप्रथम, मला आणि माझ्या सहकार्यांना मंडळाच्या कार्यकारिणीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार!
हे वर्ष इतक्या लवकर समाप्ती ला येत आहे, हेच अजून आत्मसंमत होत नाहीये. २०२० साली सर्वांना नवीन अनुभव, नवीन जीवनशैली तसेच आरॉग्याकडे अधिक लक्ष्य देण्यास भाग पाडले.

साहजिकच ह्या वर्षी कार्यक्रमांची रूपरेषा आणि आयोजन डिजिटल माध्यमातून करणे भाग पडले. वर्षाच्या सुरुवातीला आपण संक्रांत सण जोरात साजरा केला. मार्च मध्ये "अमर फोटो स्टुडिओ" नाटक आयोजित केले होते. कोविद-१९ कारणामुळे ते नाटक ऐनवेळी रद्द करावे लागले. ह्या वर्षी गणेश चित्र रेखांकन कार्यशाळा झूम वर आयोजित केली होती. सर्व वयोगटातील मुलांनी हौशीने भाग घेऊन आपल्या कलेने आणि कौशल्याने सुंदर सुंदर गणेशाची चित्रं काढली.

ह्या वर्षी गणपतीची स्थापना आणि १० दिवस पूजा अध्यक्ष शेखर गणोरे यांच्या निवास्थानी करण्यात आली. कोविदच्या वातावरणामुळे २०२० चे कार्यक्रम डिजिटल माध्यमातून यशस्वीरित्या पूर्ण झाले.

ह्या वर्षी आपण मंडळाच्या वतीने मराठी शाळा परत सुरु केली. सुरुवात आणि सरस वयोगटातील विद्यार्थी प्रत्येक शनिवारी मन लावून मराठी शिकत आहेत. हा उपक्रम चालू करण्यात आपल्या मंडळाचे उत्साही कार्यकर्ते आणि स्वयंसेवक ह्यांचा मोलाचा वाटा आहे.

कुठल्याही स्वयंसेवी संस्थांचे कार्य हे सभासद, कार्यकर्ते, आणि पुरस्कर्ते ह्यांच्या सहभाग व श्रमातूनच पुढे जात असते. ईशान्य ओहायो मराठी मंडळाला गेली अनेक वर्षं सर्व घटकांनी मंडळाच्या कार्यावर विश्वास ठेवून मनापासून पाठिंबा दिला व त्यामुळेच ४४ वर्षां पूर्वी पेरलेल्या त्या बीजाचे आज बहारदार वृक्षात रूपांतर झाले आहे.

मंडळाची सदस्य संख्या वाढवणे, सर्व वयोगटातील सदस्यांना भावतील असे कार्यक्रम आयोजित करणे, जास्तीत जास्त व विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि विशेष म्हणजे नवीन पिढीला मराठी अस्तित्वाची विचारशैली मिळावी हे सर्व प्रमुख ध्येय समोर ठेवून, मी २०१८ मध्ये अध्यक्ष पदाची धुरा हातात घेतली. बोलता बोलता ३ वर्षाचा कालावधी कसा पूर्ण झाला कळलेच नाही. ह्या ३ वर्षांच्या प्रवासात मला अनेक अगणित जिवाभावाच्या लोकांनी मदत आणि मार्गदर्शन केले. मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

मी अत्यंत आनंदी, तृप्त आणि ऋणी आहे की मला तुमच्यासोबत राहून ह्या ईशान्य ओहायो मराठी मंडळाच्या जगन्नाथाच्या रथाला पुढे नेण्यास हातभार लागला. असेच ह्यापुढे मी मंडळाचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून निष्काम कर्म / योगदान करत राहावे, हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

आपला ऋणी,<br>
शेखर गणोरे<br>
अध्यक्ष, २०१८ -२०२०

# सुरवात तर केली आहे..

आनंद मोरे

आम्ही मराठीच बोलतो, पण मुले इंग्लिश मध्ये उत्तर देतात…! काय करायचं सांगा?
थोडं तरी यायला पाहिजे ना? आजी, आजोबांशी, भारतातील नातलगांशी  बोलता येईल इतकं तरी? इतकी सुंदर गाणी आहेत, मराठी वाङ्मय आहे, ज्ञान आहे, सिनेमे आहेत.. आता ह्या नव्या पिढीने मराठी भाषा शिकलीच नाही तर हे सगळे विलोप पावेल का हो? प चा फ, क चा ख, त चा थ .. मजा मजा आहे सगळी. मराठी तसं येतं.. पण बोलायला लाजते. हे असे संवाद इथे अमेरिकेत घराघरात ऐकायला मिळत असतात.

आपल्याला काही करता येईल का?
मुलांना मराठी शिकवायचा प्रयत्न करायचा का? पण मी कुठे मराठी शिक्षक आहे? कसे जमणार? आपलीच मुले ऐकत नाहीत, बाकीच्यांची थोडी ऐकणारेत? मला तरी कुठे इतके चांगले इंग्लिश येत होते? चार चौघांचे ऐकून शिकलोच की. भीती किंवा लाज चेपायला पाहिजे.
अनुजा म्हणाली, एकट्याला नाही जमणार, पण आपण सगळे मिळून केले तर नक्की शक्य होईल. अरे आपल्या संध्या ताई आणि निलेश BMM ची मराठी शाळा चालवायचे. त्यांना विचारून बघुयात. तू सुरु कर .. आम्ही नक्की येतो. आपल्याकडे मुळाक्षरांचे तक्ते आहेत, पुस्तकं आहेत, बाकी काही लागले तर मागवून घेता येईल.



इला म्हणाली, मी गोष्टी सांगू शकते आणि खेळ पण घेईन. तुला जी लागेल ती मदत करू मी आणि हर्षद. केतकी - मी येईन जसे शक्य होईल तसे. गाणी घेऊ शकते, गोष्ट किंवा अक्षरे पण शिकउ शकते. उमेश - मला सांग काय करायचे ते. मी जरूर मदत करेन.

कोविड १९ ने एक चांगली संधी दिलीय. अनायासे मुले कॉम्पुटरवरच शाळा शिकतायत. मग आपल्याला पण ऑनलाईन मराठी शाळा सुरु करता येईल.
शेखर म्हणाला, आपल्या मराठी मंडळाचे झूम अकाऊंट आहे. तू वापरू शकतोस. आणि Whatsapp ग्रुप वर टाकलेस तर आणखी मेंबर्स मदतीला येतील.


Whatsapp ग्रुप वर टाकलेल्या पोस्टला खूप छान प्रतिसाद मिळतोय. २५ पेक्षा जास्त मुलांनी नाव नोंदवली आहेत. ५ वर्षांपासून ते १३ पर्यंत. एकाच वर्गात एवढे सगळे जण नाही बसवता येणार. कमीत कमी दोन वर्ग करावे लागतील. लहान वर्ग आणि मोठा वर्ग म्हणण्या पेक्षा, 'सुरवात गट' आणि 'सरस गट', नावं  कशी वाटतायत? सुरवातीला एकदम मुळाक्षरे नको घ्यायला. आणि व्याकरणावर आणि लिखाणावर खूप भर नको.
पेक्षा मुलांना अक्षर ओळख व्हावी, थोडे मराठी कानावर पडावे, आपल्या सारखी दुसरी पण मुले आहेत हे बघून मराठी शिकायची इच्छा व्हावी, चार गोष्टी सांगून चांगल्या मूल्यांची ओळख करून द्यावी, आणि हो सगळ्यांना मजा यावी असे काही तरी करूयात. होतील चुका तरी ठीक आहे, आपण पण त्यांच्या बरोबरच शिकवायला शिकुयात.


क्षितिजा - आनंद मी पण एक गोष्ट किंवा गाणे घेते पुढच्या आठवड्यात. मी कधी शिकवले नाही, पण प्रयत्न करेन.
रुपाली (रडे) - मी मुळाक्षरे घेऊ शकते. आणि पुढच्या आठवड्यात श्रीकृष्ण जन्माष्टमी आहे, श्री कृष्णाची गोष्ट सांगेन मी
रुपाली (मुळगे) - मी इथे हिंदी आणि मराठीचे वर्ग घेते आहे. खूप छान उपक्रम चालवलाय तुम्ही. मी पण येईन शिकवायला.
तन्मयी - ए मी एक बडबड गीत घेऊ का? उमा, कुणाल ला हे  खूप आवडायचे त्यांच्या लहानपणी.
सौरभ - माझ्याकडे अमर चित्रं कथाची गोष्टीची पुस्तके आहेत. मुलांना चांगल्या मूल्य शिकवणाऱ्या गोष्टी शिकवता येईल.. अरे मग घेतोस का तूच एखादा
भाग? हो .. बघू.. प्रयत्न करतो.

शाळेचं वर्ग सुरु होऊन चार महिने बघता बघता गेलेत. दोन्ही गट खूप जोमाने सुरु आहेत. नवीन मुले वाढत आहेत आणि नवीन शिक्षकही. Google drive वर आठवड्याचे वेळापत्रक ठरते. एका गटात ३, असे ५ ते ६ शिक्षक दर आठवड्यात पुढे येतात.


Whatsapp च्या ग्रुप वर मुलांनी गृहपाठ केलेली चित्रे आणि व्हिडिओ येतात तेव्हा जाणवते काही तरी भरीव घडतंय. आणि प्रत्येक शनिवारी ३ वाजता क्लास संपला, की आमच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि मुलांच्या लुकलुकत्या डोळ्यातून आमच्या मनात नकळत झिरपलेली उर्मी आठवडाभर पुरून उरेल इतकी साठून जाते.

मराठी शाळेचं शिक्षक -  निलेश कुलकर्णी, ईला कुलकर्णी, शेखर गणोरे, उमेश चिटणीस, रुपाली रडे, रुपाली मूळगे, संध्या देशपांडे, केतकी अलुरकर, अनुजा मोरे, तन्मयी दीक्षित, सौरभ सोनार आणि आनंद मोरे.


Numbers 1-10 and 12 Swars
१|२|३|४|५|६|७|८|९|१०
अ आ इ ई
उ ऊ ए ऐ
ओ औ अं अः
PARENT SIGNUTURE


Marathi Homework
चैत्र - Chaitra - April - May
वैशाख - Vaishakh - May - June
ज्येष्ठ - Jeshta - June - July
आषाढ - Ashad - July - August
श्रावण - Shravan - August to September
भाद्रपद - Bhadrapad - September - October
आश्विन - Ashwin - October - November
कार्तिक - Kartik - November - December
मार्गशीष - Margashirshya - December - January
पौष - Paush - January - February
माघ - February - March - Maagh
फाल्गुन - Faalgun - March - April


ससा


गाडी
भात
भूत
भ
ग
गणपती
भाऊ
भेळ
गवत

# मंडळाची आर्थिक बाजू

| Unaudited Financial Statement for FY2020 | | |
|---|---|---|
| **2020 Starting Balance (as of Jan-1st 2020)** | **$ 4,252.47** | |
| **Revenues** | | |
| January:<br>Memberships / Donations | $ 80.00 | |
| February:<br>Memberships / Donations | $ 1,567.85 | |
| March:<br>Memberships / Donations | $ 500.36 | |
| May:<br>Hungama tickets | $ 492.00 | |
| August:<br>Memberships/Marathi Shala fees | $ 280.00 | |
| September:<br>Memberships/Marathi Shala fees | $ 25.00 | |
| November:<br>Memberships/Marathi Shala fees | $ - | |
| **Total 2020 Revenue** | **$ 2,945.21** | |
| **Expenses** | | |
| January:<br>new website domain/Sankrant/Amar Photo Studio | | $ 123.50 |
| February:<br>Sankrant / APS | | $ 1,746.39 |
| March:<br>Sankrant Expense / BMM Membership | | $ 694.00 |
| August:<br>Zoom subscription / Website | | $ 34.14 |
| October:<br>Ganpati Competition Prizes / Outreach Promotions/Zoom | | $ 596.19 |
| November:<br>Diwali Expenses (Not deposited yet) | | $ - |
| **Total 2020 Expenses** | | **$ 3,194.22** |
| **Total Balance in account as of 11/9** | **$ 4,003.46** | |
| **Trustee Account interest transfer (Not Provided since FY 2019)** | **$ -** | |
| Pending Deposits (Donations/Membership/Shala) | $ 425.00 | |
| **Approximate Balance at end of 2020 (Subject to change)** | **$ 4,428.46** | |
| **Profit/Loss for 2020**** | ***$*** | ***175.99*** |

**** Does not include transfer of interest accumulated from Trustee Account**

# २०२० समिती


शेखर गणोरे,
अध्यक्ष


उत्कर्ष हजर्नि,
उपाध्यक्ष


रितू चक्करवार,
सचिव & ज्योती संपादक


श्रीरंग दातार, कोषाध्यक्ष


अश्विन मळगांवकर, वेबमास्टर

## सांस्कृतिक व्यवस्थापक


राधिका मळगांवकर


पल्लवी चव्हाण

## लॉजिस्टिक व्यवस्थापक



विवेक विन्हेरकर



अभिजीत कुरणे

## अन्न व्यवस्थापक



केतकी अलुरकर



अपूर्वा चिटणीस

## कार्यक्रम व्यवस्थापक



हर्षद कुलकर्णी



हर्षल बरीदे



विश्वेशा  देशपांडे

## मराठी शाळा



निलेश  कुलकर्णी



आनंद मोरे

## बी. एम. एम.  प्रतिनिधी (२०१९-२०२२)



संदीप दीक्षित

## सालागर/   विश्वस्त



डॉ.  जगदीश  मुडे



संध्या कृष्ण देशपांडे



तन्मयी दीक्षित